# नियमित दिवाणी दावा नं.–१५७/२०२० मधील नि.१२ वरील आदेश

१.. अर्ज व म्हणणे वाचले. प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री.के.पी.शेटे व वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.आर.शेटे यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी अर्जाप्रमाणे व म्हणणेप्रमाणे युक्तिवाद केला.

२.. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी यानी नमूद केले की, दाव्यासंबंधी महत्वाची व कागदपत्र वेळेत उपलब्ध न झाल्याने व त्याना कायदयाचे ज्ञान नसलेने व संपूर्ण देशात कोव्हीड–१९ या संसर्गजन्य आजारामुळे लॉकडाऊन असलेमुळे वेळेत कोर्टात हजर राहून, कैफियत देता आले नाही. सबब, त्यांनी विना–कैफियतीचा झालेला आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेकरीता विनंती केली आहे.

३.. वादीने म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर अमान्य केला. वादीने म्हणणेत कथन केले की, सदरच्या अर्जातील कारण योग्य नाही. प्रतिवादीने विनाकारण विलंब केला आहे. सबब,सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४.. वर नमूद बाबींचा व संपूर्ण संचिका पाहता असे दिसून आले की, प्रस्तुतचा दावा हा वाटप व जाहिर ठरावासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी नं. १ ते ३ व ५ यांना समन्स व बेलीफ अहवाल (नि.८) पाहता दि.२५/०१/२०२१ रोजी प्रतिवादी नं. १ ते ३ व ५ यांना समन्स नोटीस मिळाले होते, ते वकीलामार्फत दि.२९/०१/२०२१ रोजी हजर झाले. परंतू, त्यांनी दिलेल्या मुदतीत कैफियत दिले नाही. प्रतिवादीनी प्रस्तुत अर्ज हा शपथेवर दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी याला महत्वाची माहिती व कागदपत्र वेळेत उपलब्ध न झाल्याने, त्यांना कायदयाचे ज्ञान नसलेमुळे व त्या दरम्यान लॉकडाऊन चालू झालेने त्यांना मे. कोर्टात हजर राहता आले नाही व ते कैफियत दाखल करु शकले नाहीत असे कारण नमूद केले. तसेच सदर अर्जासोबत व कैफियतीसोबत एकही कागदपत्र दाखल केलेले नाही. न्यायप्रणालीचे तत्वाप्रमाणे कैफियत/म्हणणे दाखल करतेवेळी पक्षकाराने सर्व अवलंबून राहणारे कागदपत्रे दाखल करणे गरजेचे आहे.

५.. वर नमूद बाबींचा व संपूर्ण संचिका पाहता असे दिसून आले की, प्रतिवादीने दिलेल्या मुदतीत अगर अपवादात्मक परिस्थितीमध्ये ९० दिवसांच्या आत कैफियत व म्हणणे दाखल केले नाही.

दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ मधील आदेश ८ नियम १ मध्ये तरतूद नमूद आहे की, ''प्रतिवादीला दाव्याचे समन्सची बजावणी झालेल्या तारखेपासून त्याने ३० दिवसांच्या आत त्याची कैफियत दाखल करावी. तसेच सदर तरतूदीमध्ये परंतुकेव्दारे तरतूद करण्यात आलेली आहे की, जर प्रतिवादी याने ३० दिवसांच्या मुदतीत कैफियत दाखल न केल्यास त्याने योग्य तो कारण नमूद केले असता ९० दिवसांच्या आत कैफियत अपवादात्मक परिस्थितीमध्ये दाखल करुन घेता येईल.''

६.. न्यायप्रणालीचे तत्वाप्रमाणे प्रत्येक पक्षकारास आपली बाजू मांडण्याकरीता योग्य ती न्यायीक संधी देणे हे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटप होणेकरीता असून प्रतिवादीना बचाव घेण्यास झालेला उशीर माफ करून, त्यासंदर्भात बचाव मांडण्याकरीता संधी देणे मला न्यायोचित वाटते. सदर प्रतिवादीना बचावाची संधी न दिल्यास भविष्यामध्ये बहू दावे होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच प्रतिवादीची कैफियत व म्हणणे दाखल करुन न घेतल्यास, त्यांच्या न्यायीक हक्कावर गदा येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. दरम्यान शासनाने कोरोना रोगामुळे लॉक डाउन जाहीर केलेली होती. सबब, प्रतिवादीचे कृत्य पाहता त्यांचेवर खर्च रक्कम लादणे मला न्यायोचित वाटते. सबब, वर नमूद विवेचनांचा व अर्जातील कारणाचा विचार करता मला खालील आदेश पारीत करणे न्यायोचित वाटते.

**<u>आदेश</u>**

.१. प्रतिवादी नं. १ ते ३ व ५ यांचा प्रस्तुत नि.१२ हा अर्ज खर्च र.रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) वर मंजूर करण्यात येत असून सदरची रक्कम ही पुढील नेमलेल्या तारखेस किंवा त्या आगोदर वादीला देण्यात यावे.

*(खुल्या न्यायालयात न्यायसनावर घोषित करण्यात आला.)*

GAJENDRA MADANLAL KOLHAPURE
Digitally signed by GAJENDRA MADANLAL KOLHAPURE
Date: 2022.01.24 15:08:35 +0530

म्हसवड. **(गजेंद्र म. कोल्हापुरे)**

दि.२०/०१/२०२२ दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,म्हसवड.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | U.B.Thorat,Stenographer (Grade III) |
| Name of Court | C.J.J.D.,Mhaswad, Tal.Man |
| Date of Dictation | 20/01/2022 |
| Order signed by the P.O. on | 24/01/2022 |
| Order uploaded on | 24 /01/2022 |